# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २८.०९.२०२६ सोमवार**

**(कामगिरी)**

**१) पोलीस आयुक्तालय, परि.क्र. ४ अंतर्गत संघठीतपणे अंमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळीविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई.**

दिनांक १५.०६.२०२६ चे ०२.५० वा. ते ०५.४० वा. चे दरम्यान, गुन्हेशाखा अंमली पदार्थ विरोधी पथक पोलीस हे पोलीस ठाणे अजनी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, नरहरीनगर, वास्तु रेसीडेन्सी समोर दोन काळया रंगाचे अॅक्टिवा मोपेड वाहनावर चार संशयीत इसम दिसल्याने त्यांना पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी आपली नांवे १) पियुष मारोतराव मलवंडे वय ३० वर्षे रा. लभानतांडा, मोतीदास मंदीरजवळ, जुनी शुक्रवारी, कोतवाली, नागपूर ह.मु. वास्तु डेसीडेन्सी, नरहरी नगर, नागपूर २) राहुल संजय गोराडे वय ३६ वर्षे रा. गणेशनगर, दुर्गामाता मंदीरजवळ, नागपूर ३) आर्य शामकुमार गोरेले वय २३ वर्षे रा. दरेकर झेंडाजवळ, रामबाग कॉलनी, इमामवाडा, नागपूर ४) मनिष सुनिल दुर्वे वय २२ वर्ष रा. रामबाग, हनुमान मंदीरमागे, इमामवाडा, नागपूर असे सांगीतले. त्यांचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून, त्यांची अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन झिपलॉक पन्नीत एकुण ६५ ग्रॅम एम.डी. पावडर किमती ६,५०,०००/— रू. ची मिळून आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०४ मोबाईल फोन, मोपेड गाडी क्र. एमएच ४९ व्हीसी ३३०१ व एमएच ४९ बीक्यु १६६१ असा एकुण ८,८०,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी त्याचा साथिदार पाहिजे आरोपी प्रतिक किंदर्ले, नागपुर याचे मदतीने आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला होता. आरोपींना अटक करण्यात आली होती. गुन्हयातील आरोपी क्र. ५) प्रतिक प्रविण किंदर्ले वय २९ वर्ष रा. वार्ड क्र. ४, मांढळ ता. कुही जि. नागपुर यास अटक करणे बाकी आहे.

गुन्हयातील आरोपी आर्य शामकुमार गोरेले वय २३ वर्षे हा टोळीप्रमुख असुन त्याचेविरुध्द खंडणी मागणे, हत्यार बाळगणे, मारामारी करणे, शिवीगाळी करणे, धमकी देणे, गृह अतिक्रमण करणे यासारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. गुन्हयातील इतर आरोपी व पाहिजे आरोपी हे टोळीचे सदस्य आहेत. ते कोणताही समाजमान्य कामधंदा न करता, त्यांनी नागपुर शहरात अनेक ठिकाणी जिवे ठार मारण्याचा प्रयत्न करणे, अवैद्य हत्यार बाळगणे, मारहाण करणे, अश्लील शिवीगाळ करणे, विनयभंग करणे असे एकुण १४ गुन्हे दाखल आहेत. टोळीतील सदस्यांविरुध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुदधा त्यांनी गुन्हेगारी कृत्ये सुरुच ठेवली आहेत. आरोपी हे अत्यंत निर्ढावलेले असुन, त्यांचे कृत्याने सामान्य नागरिकांचे मनात जिवीत व मालमत्तेविषयी असुरक्षिततेची भावना व भिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत नियंत्रण कायदा अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा. वरिष्ठांचे आदेशाने गुन्ह्यामध्ये कलम ३(१)(ii),३(२),३(४)

महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा— १९९९ (मकोका) अन्वये कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास मा. श्री नरेंद्र हिवरे, सहायक पोलीस आयुक्त, अजनी विभाग करीत आहेत.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग), मा. श्रीमती पोलीस रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४) यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस ठाणे अजनी येथील वपोनि. श्री नितीनचंद्र राजकुमार, पोनि गुन्हे श्री प्रभाकर कवाडे, सफौ. रवि लांडे यांनी केली.

गुन्हेगारी प्रवृत्ती करणारे तसेच, संघठीतपणे अंमली पदार्थ तस्करी व दहशत निर्माण करणारे, गुन्हेगारी करणारे समाजकंटक गुन्हेगारांविरूध्द नागपुर शहर पोलीसांची शुन्य सहनशिलता (झिरो टॉलेरन्स) भुमिका कायम राहणार आहे.

**२) हुडकेश्वर पोलीसांची कामगिरी :— फसवणुक करणाऱ्या दोन आरोपींना अटक.**

फिर्यादी श्रीमती दिव्यांशा सिताराम मिना वय ४० वर्षे रा. अंबाझरी ऑर्डनन्स फॅक्ट्री वसाहत, वाडी नागपूर हया कॅनरा बॅक, हुडकेश्वर शाखा येथे बॅक मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. ग्राहकांनी बॅकेंत येऊन एटीएम मधुन पैसे निघत नसल्याची तक्रार दिल्याने, फिर्यादी यांनी स्टाफसह त्यांचे बॅकेचे शाखेतील एटीएमची पाहणी केली असता, सीसीटिव्ही फुटेजमध्ये अज्ञात दोन इसम यांनी एटीएमच्या कॅश डिस्पेन्सर, जेथुन पैसे बाहेर पडतात, त्याठिकाणी प्लास्टीक पट्टीचा उपयोग करुन नंतर दोन इसम पट्टी बाहेर काढून रक्कम चोरी करीत असल्याचे दिसुन आले. दिनांक १२.०९.२०२६ चे १९.०० ते दिनांक १४.०९.२०२६ चे २०.५६ वा. चे दरम्यान, अज्ञात दोन आरोपींनी संगनमत करुन, कॅनरा बॅकेंचे एटीएम मध्ये येणाऱ्या ४१ लोकांची फसवणुक करुन एकुण १,५२,०००/— चोरुन काढून घेतले अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात दोन आरोपीविरूध्द कलम ३०३(२),३१८(४),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे तपासादरम्यान, हुडकेश्वर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे दिनांक २७. ०९.२०२६ रोजी पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, मानेवाडा रोड, पडोळे मेडीकलचे बाजुला असलेल्या कॅनरा बॅकेंजवळ एक पोपटी रंगाचा शर्ट घातलेला इसम संशयास्पद हालचाली करतांना दिसल्याने, त्याचेजवळ जात असतांना, तो पळून जाण्याचे तयारीत असतांना त्यास ताब्यात घेतले. त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव सतिश गोरेलाल राजपुत वय ३२ वर्ष रा. घर क्र. १००, दहेली गाव, ता. जि. कानपुर, उत्तर प्रदेश असे सांगितले. पंचासमक्ष त्याचेजवळील बॅगची पाहणी केली असता, त्यामध्ये काळया रंगाची ०५ पट्टी, चिकट टेप, फेविक्विक, कैची, वेगवेगळया बॅकांचे एटीएम कार्ड व रोख ७,५००/— असा मुद्येमाल मिळून आला. कॅनरा बॅकेच्या एटीएमची पाहणी केली असता, तेथे एटीएम मशिनचे पैसे निघण्याचे जागेवर काळी पट्टी चिटकवलेली दिसुन आली. ती काढून नमुद इसमास पोलीस ठाणेस आणुन त्यास सखोल विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार आरोपी धमेंद्र राजकपुर शाहु वय ३५ वर्ष रा. प्लॉट क्र. २६५७, देवतार रोड, रामायण मंदीरजवळ, जबलपुर, मध्यप्रदेश याचेसोबत संगनमत करुन दिनांक १२.०९.२०२६ ते १४.०९.२०२६ चे दरम्यान वरील कॅनरा बॅक एटीएमचे कॅश ट्रालीला पट्टी लावून ८ ते १० वेळा त्यामधील रक्कम काढल्याचे कबुल केले. आरोपीचे माहितीवरुन आरोपी धमेंद्र राजकपुर शाहु याचा शोध घेऊन त्यास सिताबर्डी परिसरातुन ताब्यात घेण्यात आले. आरोपींना गुन्हयात अटक करुन आरोपींचे ताब्यातुन वर नमुद मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, मा. श्री वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त (दक्षिण विभाग), मा. श्रीमती पोलीस रश्मिता राव, पोलीस उप आयुक्त (परि.क्र. ४), मा. श्री नरेंद हिवरे, सपोआ, अजनी विभाग यांचे मार्गदर्शनाखाली,

वपोनि श्रीमती अनामिका मिर्झापुरे, दुपोनि राजेंद्र दराडे, पोउपनि सुमेदकुमार जाधव, पोहवा गोपाल देशमुख, संदीप पाटील, दिनेश गाडेकर, चेतन वैद्य, विजय सिन्हा, प्रविण जांभुळकर, पोअं मंगेश मडावी, प्रज्वल वाणी, हिमांशु पाटील व पांडे यांनी केली.





**३) पोलीस आयुक्तालय, परि.क्र. ४ अंतर्गत कुख्यात गुंड हद्दपार :–**

पोलीस ठाणे बेलतरोडी हददीत, **प्लॉट क्र. आरबीआय, हरीहर नगर, बेलतरोडी रोड, नागपूर येथे राहणारा गुन्हेगार ईसम नामे रित्वीक सुरेंद्र हरणे, वय २२ वर्षे** याचेविरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे गंभीर दुखापत करणे, बेकायदेशीररित्या शस्त्र बाळगणे, गैरकायद्याची मंडळी जमवुन दंगा करणे, हातबुक्कीने मारुन शिवीगाळ करुन धमकी देणे, चोरी करणे, दरोडयाची पुर्वतयारी करणे, मारपिट करणे ईत्यादी गंभीर स्वरूपाचे विविध गुन्हे दाखल असुन, त्याचेवर वारंवार कारवाई करूनही त्याचे प्रवृत्तीत कोणतीही सुधारणा झाली नाही. त्याचेमुळे स्थानिक नागरिकांचे जिवीतास व मालमत्तेस धोका निर्माण होऊन नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याने त्यास स्थानिक परिसरात ठेवणे धोकादायक असल्याने तसेच नमुद गुन्हेगार इसमाचे वर्तणुकीत सुधारणा व्हावी, याकरीता बेलतरोडी पोलीसांनी आरोपीविरूध्द हद्दपार प्रस्ताव तयार करून, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०४ नागपुर शहर याचेकडे सादर केला. मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्र. ०४, नागपुर शहर यांनी हददपार आदेश क्र. १८/२०२६ दिनांक २१.०९.२०२६ अन्वये गुन्हेगारास नागपूर शहर व नागपुर ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार करण्याचा आदेश पारीत करण्यात आला होता. सदर आदेशाची अंमलबजावणी करुन नमुद आरोपीस त्याचे नातेवाईकाचे घरी पवनी जि. भंडारा येथे सोडण्यात आले आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे खापरखेडा :– वाळु चोरी करणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.०९.२०२६ चे १२.०० वा. चे सुमारास, खापरखेडा पोलीसांचे पथक पेट्रोलींग करीत असता, त्यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, सुरादेवी रोड, वारेगाव, ता. कामठी येथे गेले असता, तेथे ट्रक क्र. एमएच ४० बीजी ०८०१ दिसुन आला. पंचासमक्ष ट्रकची पाहणी केली असता, त्यामध्ये वाळु भरुन दिसली. ट्रकचालक नामे जायद मोहम्मद शेख वय २२ वर्ष रा. वार्ड क्र. ४, बिना संगम, खापरखेडा यास कागदपत्रे व परवाना मागितला असता, त्याने कोणताही परवाना वा कागदपत्रे सादर केले नाहीत. अधिक विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार रमजान शेख समशेर शेख वय २६ वर्ष रा. वार्ड क्र. ४, बिना संगम, खापरखेडा याचेसह संगनमताने कन्हान नदीचे पात्रातुन वाळु चोरी करुन आणल्याचे सांगितले. आरोपीविरुध्द पोलीस ठाणे खापरखेडा येथे कलम ३०३(२),३(५) भा.न्या.सं. सहकलम ४८(७),४८(८) जमीन महसुल अधिनियम १९६६ सहकलम ४,२१ खाण आणि खनिज अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान अधिनियम १९८४ अन्वये गुन्हा नोंद करुन आरोपीस अटक करण्यात आली आहे. आरोपीचे ताब्यातुन ४

ब्रास वाळु व ट्रक असा एकुण १०,६८,०००/— रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे नंदनवन :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २८.०९.२०२६ चे ०३.१० वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, हसनबाग, औरंगजेब चौक येथे एक इसम पोलीसांना पाहून अंधाऱ्या गल्लीत पळाल्याने, पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव राजेश अंजन वंजारी वय ३० वर्षे रा. लकडगंज बुध्द विहारजवळ, नागपूर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे कंबरेत पॅन्टचे आत एक लोखंडी चाकु किंमती ५००/— रू. चा मिळून आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा आपले अस्तित्व लपवुन कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे सपोनि श्रीराम काळे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १२२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (मिसींग)

**१) पोलीस ठाणे कोराडी :—** फिर्यादी रामदया जगन मेंढे वय ३८ वर्षे, रा. कवठा, ता. कामठी, जि. नागपूर यांनी पोलीस ठाणे कोराडी येथे तक्रार दिली की, त्यांची पत्नी नामे सौ.प्रिती रामदया मेंढे वय ३८ वर्षे ह्या दिनांक १८.०९.२०२६ चे २१.०० वा. पासुन पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरुन बेपत्ता झाल्या आहेत. त्यांचा शोध घेतला असता, मिळून आल्या नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांना फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची—५ फुट ४ इंच, केस—काळे लांब, डोळे—काळे, अंगात— लाल रंगाची सलवार कमीज घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे कोराडी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**२) पोलीस ठाणे कोराडी :—** कृष्णकुमार हरीचंद्र नेवारे वय २७ वर्षे, रा. हनुमान मंदीरजवळ, सतरापुर, नारायणा शाळेजवळ, कोराडी, नागपूर हे दिनांक २१.०९.२०२६ चे १०.०० वा. चे सुमारास पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—निमगोरा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट, केस—काळे, अंगात— ग्रे रंगाचा टि—शर्ट व काळ्या रंगाचा फुलपॅन्ट घातलेला आहे. भाषा—हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे हुडकेश्वर :—** फिर्यादी हर्षल कालिदास घायवट वय २१ वर्षे रा. कोछी, ता. सावनेर जि. नागपूर यांनी पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे तक्रार दिली की, त्यांची बहिण नामे कु. दर्शना कालिदास घायवट वय १८ वर्षे रा. ह.मु. समाधान कॉलनी, प्लॉट क्र. ११८, दुबे नगर, साठकर यांचे घरी किरायाने, नागपूर ही दिनांक १९.०९. २०२६ चे १०.३० वा. पासुन पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीतील राहते घरुन निघुन गेली. तिचा शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तिला फुस लावून पळवून नेले असावे. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—गोल, बांधा—साधारण, उंची—५ फुट, केस—काळे लांब, डोळे—काळे, अंगात— लाल रंगाचा टॉप घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते. फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भान्यासं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

  

सौ.प्रिती कृष्णकुमार हर्षल

स्वा/–

( अंकुश राठोड )

पोलीस उप निरीक्षक,

पोलीस जनसंपर्क अधिकारी,

नागपुर शहर.